POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण

बातमीपत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-५८ ● मुंबई, मंगळवार, ३० सप्टेंबर २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## पुणे हडपसरमध्ये भव्य मोफत आरोग्य शिबीराचे आयोजन



या उपक्रमात एशान तुपे, कुमार तुपे, प्रकाश काळसे, सुनील हरपळे, प्रकाश कदम, प्रवीण डांगे, दिनेश माटे, प्रणित शेलार, रोहन हरपळे, मनोज तुपे, स्वानंद तुपे, प्रज्योत हरपळे, सौरभ नेळेकर, अंकित चव्हाण, हर्षद तुपे, विश्वजीत नेळेकर, अभि सुपेकर, आदित्य जगताप, आदित्य गायकवाड, आशिष शिंदे, दिगंबर टिळेकर आदी युवकांनी उत्साहाने सहभाग घेतला आणि शिबिर यशस्वी केले.



कार्यक्रमाचे नेतृत्व आश्रय ट्रस्ट (मुंबई-ठाणे) चे संस्थापक डॉ. दीपक मोरेश्वर नाईक आणि संस्कार सेवा फाऊंडेशनच्या संस्थापिका सौ. पिंकी पाटील यांनी केले.



■ **बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

**पुणे** : हडपसर परिसरात आज समाजोपयोगी उपक्रमांच्या माध्यमातून नागरिकांसाठी आरोग्यदायी वातावरण निर्माण झाले. आझाद युवक मंडळ, आश्रय सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक ट्रस्ट आणि समता संस्कार सेवा फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या शिबिराचा लाभ शेकडो नागरिकांना झाला असून, परिसरात समाधानाचे वातावरण दिसून आले. समाजसेवेची परंपरा जपणाऱ्या आझाद युवक मंडळाचे यंदा ३३ वे वर्ष आहे. 'समाजसेवा हीच खरी सेवा' या ब्रीदवाक्याला साजेशा पद्धतीने त्यांनी समाजात आदर्श निर्माण केला आहे. कार्यक्रमाचे नेतृत्व आश्रय ट्रस्ट (मुंबई-ठाणे) चे संस्थापक डॉ. दीपक मोरेश्वर नाईक आणि संस्कार सेवा फाऊंडेशनच्या संस्थापिका सौ. पिंकी पाटील यांनी केले. तसेच आश्रय ट्रस्ट पुणे विभाग अध्यक्षा डॉ. कल्पिता पाटील उपस्थित होत्या. शिबिराच्या नियोजनाची महत्त्वाची जबाबदारी प्रवीण सुर्वे यांनी यशस्वीपणे पार पाडली.

**शिबिरात नागरिकांसाठी विविध सेवा उपलब्ध करण्यात आल्या:**

- मोफत जनरल सर्जरी सेवा (मुंबईमध्ये विशेष सोय)
- मोफत नेत्र तपासणी व कमी किमतीत चष्म्यांचे वाटप
- श्रवणयंत्र कमी दरात उपलब्ध
- बी.पी. व शुगर तपासणी
- हृदयविकार तपासणी (ईसीजी) व तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला
- कमी किमतीत जीवनसत्त्वांच्या गोळ्या
- बी.एम.आय / अस्थमा तपासणी
- त्वचारोग निदान व चामखीळ काढण्याची सोय

या उपक्रमात हर्षद तुपे, विश्वजीत नेळेकर, अभि सुपेकर, आदित्य जगताप, आदित्य गायकवाड, आशिष शिंदे, दिगंबर टिळेकर, एशान तुपे, कुमार तुपे, प्रकाश काळसे, सुनील हरपळे, प्रकाश कदम, प्रवीण डांगे, दिनेश माटे, प्रणित शेलार, रोहन हरपळे, मनोज तुपे, स्वानंद तुपे, प्रज्योत हरपळे, सौरभ नेळेकर, अंकित चव्हाण आदी युवकांनी उत्साहाने सहभाग घेतला आणि शिबिर यशस्वी केले.

या उपक्रमामुळे आरोग्य तपासणीसाठी अन्यथा मोठा खर्च करावा लागला असता तेथे नागरिकांना मोफत किंवा कमी दरात सुविधा मिळाल्याने समाजातील प्रत्येक घटकात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

हडपसरमध्ये झालेला हा आरोग्य उपक्रम समाजसेवेचे उत्तम उदाहरण ठरला असून, नागरिकांनीही आयोजकांचे मनःपूर्वक आभार मानले.

## पुरात अडकलेल्या ६६ महिलांचा व बालकांचा जीव वाचवला; डहाणु व वानगाव पोलीस ठाण्यांची उल्लेखनीय कामगिरी.

■**डहाणु। प्रतिनिधी,**

पालघर पोलीस दलास पुरामध्ये अडकलेल्या एकूण ६६ महिला व लहान मुले यांना सुखरूपपणे बाहेर काढण्यात यश.

डहाणु पोलीस ठाणे व वानगाव पोलीस ठाणे यांची उल्लेखनीय कामगिरी. अधिक माहितीनुसार दिनांक २६/०९/२०२५ ते दिनांक २९/०९/२०२५ रोजी पर्यंत भारतीय हवामान खात्याने पालघर जिल्ह्याला अतिवृष्टीचा (रेड अलर्ट) इशारा दिला होता. त्याअनुषंगाने श्री. यतिश देशमुख, पोलीस अधीक्षक, पालघर यांनी जिल्ह्यातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना आपआपले पोलीस ठाणे हद्दिमध्ये सतर्क राहुन संभाव्य पाणी भरण्याची ठिकाणे, पुर परिस्थीती निर्माण होण्याची ठिकाणे व सखलभाग इत्यादी परिसरात योग्य त्या उपाययोजना करण्याच्या सुचना दिल्या होत्या.




त्यानुसार दिनांक २८/०९/२०२५ रोजी रात्रौ ०८.०० वाजताचे सुमारास डहाणु पोलीस ठाणे यांचे डायल-११२ वर कॉल आला की, चरी-आशागड रोडवर धोडीपाडा ब्रिजवर एक टेम्पो ट्रॅव्हलर गाडी पाण्यात बंद पडली आहे. बसमध्ये एकुण १६ महिला असुन तात्काळ मदत हवी असल्याचे सांगितले. त्याप्रमाणे डहाणु पोलीस ठाण्यात डायल-११२ कर्तव्यावर असलेले पोहवा/काशिराम उंबरसाडा, पोना/गणेश गावीत यांनी तात्काळ तेथे पोहचुन परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन सदरची बाब तात्काळ श्री. किरण पवार, पोलीस निरीक्षक, डहाणू पोलीस ठाणे यांना कळवुन मदतीसाठी अतिरीक्त पोलीस स्टाफ मागवुन घेतला. सदर ठिकाणी श्रीमती अंकिता कणसे, उप विभागीय पोलीस अधिकारी, डहाणू विभाग, पोनि/किरण पवार, डहाणू पोलीस ठाणे, सपोनि/तुषार पाचपुते, वानगाव पोलीस ठाणे तसेच पोलीस अधिकारी व अंमलदार, आरसीपी पथकाचे अंमलदार असे घटनास्थळी पोहोचले. सदर ठिकाणी बस मध्ये अडकलेल्या सर्व १६ महिलांना व बस ड्रायव्हरला दोरीच्या सहाय्याने अग्नीशामक दल, आशागड ग्राम पंचायतीचे ग्राम महसुल अधिकारी व कर्मचारी यांच्या मदतीने पाण्यामधुन सुखरुप बाहेर काढले त्यामुळे पुढील संभाव्य मोठा अनर्थ टाळण्यात आला.

नमूद महिला या देवदर्शनासाठी वाणगांव बाजुकडुन संतोषी मंदीर आशागड व तेथुन पुढे महालक्ष्मी देवीचे दर्शनासाठी जात असल्याचे समजले. श्री. यतिश देशमुख, पोलीस अधीक्षक, पालघर, श्री. विनायक नरळे, अपर पोलीस अधीक्षक, पालघर यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी भेट देऊन पाहणी करुन महिलांकडे विचारपुस करून सर्व महिलांना जेवण देऊन त्यांना शासकिय विश्राम गृह, डहाणू येथे सुरक्षीत रित्या पोहचविण्यात आले.

त्याचप्रमाणे सपोनि/तुषार पाचपुते, वानगाव पोलीस ठाणे यांना स्थानिक नागरीकांकडून माहिती मिळाली की, वानगाव-चारोटी मुख्य रस्त्यावर मौजे पिंपळशेत येथे पाण्यामध्ये खाजगी बस बंद पडली आहे. सदर माहिती मिळताच पोलीस स्टापसह सपोनि/तुषार पाचपुते हे सदर ठिकाणी तात्काळ पोहोचून पाण्यामध्ये बंद पडलेल्या नमूद बसमधील एकूण ५० महिला व लहान मुले यांना सुरक्षितरीत्या बाहेर काढून दुसऱ्या वाहनाने वानगाव येथे त्यांच्या राहण्याची व जेवणाची व्यवस्था करण्यात आली. सदर बस ही वसईहून बोईसर मार्गे महालक्ष्मीच्या दर्शनासाठी निघाली असल्याचे समजले.

सदरची कामगिरी ही श्री. यतिश देशमुख, पोलीस अधीक्षक, पालघर, श्री. विनायक नरळे, अपर पोलीस अधीक्षक, पालघर, श्री. विकास नाईक, उपविभागीय पोलीस अधिकारी, बोईसर विभाग, श्रीमती अंकिता कणसे, उप विभागीय पोलीस अधिकारी, डहाणू विभाग यांचे मार्गदर्शनाखाली डहाणू व वाणगांव पोलीस ठाण्याचे अधिकारी व अंमलदार तसेच आरसीपी पथकाचे अंमलदार यांनी पार पाडली आहे.

## वरळी दुग्धशाळेच्या जागेवर मोठी व्यावसायिक संकुले उभारली जाणार



■**मुंबई । प्रतिनिधी,**

वरळी दुग्धशाळेच्या जागेवर मोठी व्यावसायिक संकुले उभारली जाणार आहेत. जागतिक दजार्चे आर्थिक केंद्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वांद्रे- कुर्ला संकुलच्या (बीकेसी) धर्तीवर आता लवकरच वरळीतही मिनी बीकेसी वसवण्यात येणार आहे. वरळी दुग्धशाळेच्या ६.४० हेक्टर जागेचा विकास मिनी बीकेसी म्हणून करण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची (एमएमआरडीए) विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. यासंबंधीचा शासन निर्णय नुकताच नगर विकास विभागाकडून प्रसिद्ध करण्यात आला आहे.

२०२३ मध्ये एमएमआरडीएने वरळी आणि कुर्ला दुग्धशाळेच्या जागेसह मुंबईतील अन्य काही पडून असलेल्या मोक्याच्या जागा शोधून त्या जागांचा विकास बीकेसीच्या धर्तीवर मिनी बीकेसी म्हणून करण्याचा प्रस्ताव प्राधिकरण बैठकीत मंजूर करून घेतला. त्यानंतर या प्रस्तावास राज्य सरकारची मान्यताही घेतली, मात्र वरळीसह अन्य ठिकाणच्या जागेचा विकास करण्यासाठी एमएमआरडीएची त्या त्या क्षेत्राकरता विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती होणे आवश्यक होते. त्यानुसार यासंबंधीचे प्रस्ताव एमएमआरडीएकडून राज्य सरकारकडे पाठविण्यात आले होते. या प्रस्तावांच्या मान्यतेची प्रतीक्षा एमएमआरडीएला होती. आता वरळी दुग्धशाळेच्या क्षेत्रासंबंधीचा प्रस्ताव राज्य सरकारने मान्य केला आहे. या शासन निर्णयानुसार वरळी दुग्धशाळेच्या ६.४० हेक्टर क्षेत्रासाठी एमएमआरडीएची नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

## म्हाडाच्या कोकण मंडळाच्या ७१ दुकानांकडे अर्जदारांची पाठ

■**मुंबई । प्रतिनिधी,**

म्हाडाच्या कोकण मंडळाने ७१ दुकानांच्या ई लिलावासाठी नोंदणी, अर्जविक्री-स्वीकृती प्रक्रियेला सुरुवात केली आहे. या ई लिलावासाठी अर्ज करण्याची प्रक्रिया शुक्रवारी (२६ सप्टेंबर) रात्री संपुष्टात येणार होती. मात्र त्याआधीच शुक्रवारी दुपारी अर्ज भरण्यासह बोली लावण्याच्या प्रक्रियेस मुदतवाढ देण्यात आली. आता अर्ज भरण्यासाठी १० ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली असून नवीन वेळापत्रकानुसार १६ ऑक्टोबर रोजी ई लिलावाच्या निकाल जाहीर होणार आहे. कोकण मंडळाच्या दुकानांना इच्छुकांकडून प्रतिसादच मिळत नसल्याने मुदतवाढ देण्याची नामुष्की कोकण मंडळावर ओढवली आहे. मुंबई मंडळाच्या १४९ दुकानांसाठी नुकताच ई लिलाव पार पडला. या ई लिलावात केवळ ७० दुकानांची विक्री झाली असून ७९ दुकाने विक्रीवाचून रिक्त राहिली आहेत. दुकाने महागडी आणि जुनी असल्याने मुंबईकरांनी ई लिलावास प्रतिसाद दिला नाही. तर आता दुसरीकडे कोकण मंडळाच्या दुकानांच्या ई लिलावाकडेही इच्छुकांनी पाठ फिरवल्याचे चित्र आहे. विरार बोळींजमधील ४४ आणि चितळसरमधील २७ दुकानांच्या ई लिलावासाठी नोंदणी, अर्जविक्री झ्र स्वीकृती प्रक्रियेस ११ स्पेटबरपासून सुरुवात करण्यात आली होती. तर अर्ज भरून संगणकीय पद्धतीने कागदपत्रे जमा करण्याची मुदत २५ सप्टेंबर रोजी रात्री ११.५९ पर्यंत होती. तर अनामत रक्कम भरून अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत २६ सप्टेंबरपर्यंत होती. त्यानंतर पुढील कार्यवाही करून १३ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ पासून पात्र अर्जदारांना संगणकीय पद्धतीने बोली लावून ई लिलावात सहभागी होता येणार होते. त्यानंतर १४ ऑक्टोबरला ई लिलावाचा निकाल सकाळी ११.०० वाजता जाहीर होणार होता. मात्र कोकण मंडळाच्या दुकानांना प्रतिसादच मिळत नसल्याने मंडळाने अखेर नोंदणी, अर्जविक्री-स्वीकृती, बोली




आणि निकाल या सर्व प्रक्रियेस मुदतवाढ दिली आहे. मंडळातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार अर्ज भरण्याची मुदत संपण्याच्या एक दिवस आधी ७१ दुकानांसाठी केवळ ५५ अर्ज आले होते. हा प्रतिसाद अत्यंत कमी असल्याने मुदतवाढ देण्याची नामुष्की मंडळावर ओढवली आहे. आता इच्छुकांन नोंदणी व अर्ज सादर करण्यासाठी १० ऑक्टोबरपर्यंत मुदत असणार आहे.



## संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# स्वच्छतेचा विषय सरकारने आता जनतेवर सोडू नये



**कें**द्र सरकारने देशातील सर्व राज्यांना स्वच्छता ही सेवा-स्वच्छोत्सव 2025 राबविण्याचे आदेश दिले आहेत. स्वच्छता आवश्यकच आहे. आपल्या राष्ट्रपित्यानेही गावे स्वच्छ करण्यासाठी हाती झाडू घेतला होता. या स्वच्छतेमागील उद्देश केवळ रस्त्यावरचा गावातील केरकचरा हटवण्याचा उद्देश त्यांचा निश्चितच नव्हता तर लोकांच्या मनात स्वच्छतेचे महत्व त्यांना रुजवायचे होते. या शिवाय महाराष्ट्रात संत गाडगेबाबांनी गावातील अस्वच्छता दूर करण्यासाठी हाती झाडू घेतानाच लोकांच्या मनातील जुन्या जीर्ण रुढीपरंपरा, अंधश्रद्धेचा कचराही काढण्याचा प्रयत्न आपल्या कीर्तनातून केला. दिवसा हाती झाडू घेऊन गाव स्वच्छ करायचे आणि रात्री कीर्तनातून लोकांच्या मनातील केरकचरा दूर करायचा कार्यक्रम त्यांचा होता. स्वच्छतेचा असा अर्थच या दोन्ही महामानवांना अभिप्रेत असावा, मात्र माणसांच्या मनातील स्वच्छतेविषयी असलेल्या उदासीनतेचा कचरा आधी स्वच्छ करण्याची गरज आहे. लोकांच्या मनात स्वच्छतेविषयी जनजागृती करण्यासाठी पालिका आणि सरकारकडून उपक्रम राबवले जातात, त्यांची संख्या अत्यंत नगण्य आहे.

रस्त्यावर अथवा सार्वजनिक ठिकाणी कचरा, घाण करणे हा आपला राज्यघटनेने दिलेला मूलभूत अधिकारच असल्याची स्थिती येथील नागरिकांची आहे. रस्त्यावरील सिग्नल तोडून वाहन पुढे दामटवणे, वाहतूक कोंडी करून नियम मोडणे हा आपला रस्त्यावरचा हक्कच असल्यासारखी स्थिती देशातील सर्वच महानगरात आहे. हे झाले एखादे उदाहरण, स्वच्छतेविषयी असलेली उदासीनता एवढी निर्ढावलेल्या स्थितीत आहे की आपल्याकडे एखादा महागडा श्वान किंवा एखादे परदेशी मांजर पाळणे हे प्रतिष्ठेचे लक्षण मानले जाते. या प्राण्यांना सार्वजनिक रस्त्यावरून फिरवर्णाया त्यांच्या मालकांना सार्वजनिक रस्ते हे आपल्या प्राण्यांच्या नैसर्गिक विधीसाठीच असल्याचे वाटतात. रस्त्यांवर आपल्या महागड्या पाळलेल्या प्राण्यांना अस्वच्छता करू देण्यासही आपल्याकडे प्रतिष्ठा लाभली आहे. अशा लोकांना समज दिल्यास रस्ते तुमच्या तीर्थरुपांचे आहेत का, जे हवे ते करा, कुठे तक्रार करायची ती करा, असा समज देर्णायांनाच उलट दम भरवणारेही कमी नाहीत. आपल्याकडे एकूणच सार्वजनिक आणि नागरी कायदे धाब्यावर बसवण्याला मोठी प्रतिष्ठा लाभली आहे. रस्त्याच्या मधोमध वाहने थांबवणे, नो पार्किंगमध्ये वाहन लावणे, घरातल्या खिडकीतूनच रस्त्यावर कचरा फेकणे, सांडपाण्यासाठी असलेल्या गटारांमध्ये कचरा टाकणे इतकेच नाहीतर अगदी महत्वाच्या नदी नाल्यांमध्ये घातक केमिकलचे टँकर रिकामे करणारे, प्रक्रिया न केलेले सांडपाणी नदीमध्ये सोडून तिचे महाकाय गटार करर्णायांनाही कायद्याचा धाक नाही. याला कारण आपल्याकडील कायदे कमकुवत आहेत, असे नाहीतर इथल्या नागरिकांनाही नागरी जबाबर्दाया आणि कर्तव्याशी कोणतेही देणेघेणे नाही, हेच आहे.

परदेशातील सार्वजनिक स्वच्छता आणि नेटकेपणाचे कौतुक करर्णाया आपल्या देशातील नागरिकांना लोकल ट्रेनमध्ये सीटवर बुटाचे पाय ठेवून राजेशाही थाटात बसणे प्रतिष्ठेचे वाटते. रस्ते, पदपथाचे कोपरे, इमारतीचे कोने, सार्वजनिक ठिकाणची वळचणे ही थुंकण्यासाठीच बनवलेली असतात, असा त्यांचा ठाम विश्वास असतो. त्यामुळे सार्वजनिक सरकारी मालमत्ता असलेली रुग्णालये, पालिका कार्यालये, सरकारी इमारतींच्या भिंतींचे कोपरे रंगीत थुंकीने रंगलेले दिसतात. आपल्याकडे देवदेवतांच्या प्रतिमा केवळ पूजाअर्चा किंवा श्रद्धेचा विषय नसतात. इमारतींच्या जिन्यातील कोर्पयात, सार्वजनिक रस्त्यांच्या भिंतीवर श्रद्धास्थानांच्या प्रतिमा डकवण्यामागे या ठिकाणी कोणी थुंकू नये किंवा कोणी नैसर्गिक विधी करू नये असाच असतो. अगदी साध्यासुधा नागरी जबाबदारीच्या समजुतदारपणासाठीही आपल्याला आपल्याच श्रद्धेच्या देवधमार्चा असा वापर करावा लागतो, हे खरेतर आपल्या श्रद्धेच्या हेतूवरच शंका निर्माण करणारे आहे. स्वच्छता आपल्या मनातच नसल्याने ती सार्वजनिक जीवनात राबवण्याचा प्रश्नच नसतो. स्वच्छतेसारख्या अभियानातून केलेल्या बॅनरबाजीतून राजकीय हेतू साध्य केले जातात.

महात्मा गांधीजींची, संत गाडगेबाबांची जयंती किंवा स्मृतीदिनी हाती झाडू घेऊन काढलेले छायाचित्र समाजमाध्यमांवर टाकून झाल्यावर आपल्याला धन्यता वाटते. परदेशात अशी परिस्थिती नसते, तिथे धूम्रपानासाठी विशेष सार्वजनिक ठिकाणे असतात, तीच सिगारेट काम झाल्यावर आपल्या पायाखाली चिरडण्यासाठी रस्त्यावरच टाकल्यास सीसीटीव्ही कॅमेंयात तो माणूस टिपला जातो. नागरिकांच्या कर्तव्यावर लक्ष ठेवणारी पोलीस नावाची गणवेशधारी मंडळी ताबडतोब घटनास्थळी दाखल होऊन दंडात्मक कारवाई करतात. आपल्या बँक खात्यातून दंडाची रक्कम वजा केली जाते. अशा वेळी आपल्या गल्लीतल्या नगरसेवकाची, आमदाराची किंवा नात्यातल्या एखाद्या अधिर्कायाचे नाव सांगून पळवाट काढणे शक्य नसते. त्यामुळेच सार्वजनिक स्वच्छतेचे सप्ताह आणि पंधरवडे राबवण्यावर खर्च करण्यापेक्षा आणि त्यासाठी सरकारी यंत्रणा जुंपण्यापेक्षा सरकारनेच महत्वाची बाब म्हणून स्वच्छतेचा विषय आपल्याच ताब्यात घ्यावा, त्यासाठी सार्वजनिक स्वच्छतेसाठी भरघोस तरतूद करावी, त्यासाठी आवश्यक कराचा बोजा उचण्यास इथले नागरिक सक्षम आहेत. सार्वजनिक स्वच्छतेचा विषय आता सरकारने जनतेवर सोडू नये, कारण त्याचा काहीही उपयोग होत नाही, हे पुन्हा पुन्हा सिद्ध झाले आहे.

# राजकारण न करता शेतकऱ्यांचे अश्रू पुसण्याची गरज!

**म**हाराष्ट्रात विशेषतः मराठवाड्यावरील अतिवृष्टी आणि पुराचे संकट पूर्णपणे टळलेले नाही. ऑक्टोबरपर्यंत पाऊस जाण्याच्या तयारीत नसल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. मराठवाड्यातील धाराशीव, बीड, जालना, लातूर, सोलापूरमध्ये पावसाने मोठे नुकसान केले आहे. मराठवाड्यातील अनेक तालुके आणि गावात पूरसदृश्य स्थिती निर्माण झाली आहे. जवळपास १५९ पेक्षा जास्त गावांना पावसाचा फटका बसला. धाराशिव जिल्ह्यात ३३,०१० हेक्टरांहून जास्त जमिनीवरील पिके नष्ट झाली असल्याची प्राथमिक माहिती आहे. या पावसाने राज्यभरात ११.७७ लाख हेक्टर शेती क्षेत्राचे नुकसान केले आहे. मराठवाड्यात कोरड्या दुष्काळाची स्थिती अनेकदा येते, परंतु अनेक वषार्नंतर ओल्या दुष्काळाचे सावट या भागावर आहे. त्यामुळे शेतर्कयांना पुन्हा उभे करण्यासाठी तातडीचा ठोस कृतीकार्यक्रम आणि दूरगामी धोरण अवलंबण्याची आवश्यकता आहे. यंदाच्या अतिवृष्टीमुळे मराठवाड्यातील शेतकरी कित्येक वर्षे मागे गेला आहे. शेतातील माती वाहून गेल्याने रब्बी पिकाविषयीही शेतर्कयाला साशंकता आहे. नांदेड जिल्हा सर्वाधिक प्रभावित जिल्ह्यांपैकी असून तिथे सुमारे ३ लाख हेक्टर पिकांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. पिकांची नासाडी झालेली आहेच, शेतातील मातीही वाहून गेल्याने शेतर्कयांचे हे नुकसान लवकर भरून येणारे नाही. आजपर्यंत मशागत, खतांनी सुपीक केलेल्या जमिनीची पीकधारण क्षमताच यंदाच्या पावसात वाहून गेली आहे. सप्टेंबरपुढचा महिना दिवाळीचा असल्याने पीक कापणीची वेळ जवळ आली होती. दिवाळीत कापणी करून डिसेंबरपर्यंत हाती मोबदला मिळण्याची स्वप्ने पाहर्णाया शेतर्कयांच्या स्वप्नांवर पाणी फेरले गेले. या पावसात सगळ्याच जास्त नुकसान अल्पभूधारक शेतर्कयाचे झाले आहे. शेकडो एकर शेतीचे मालक असलेल्या शेतर्कयांचे नुकसानही तुलनेने मोठेच आहे. परंतु अल्पभूधारक शेतर्कयांना शेतीतून विशेषतः सोयाबीनमधून मिळर्णाया नफ्यातून त्यांच्या वर्षभराची गुजराण होते. पेरणी, खते, किडीचे नियंत्रण, औषध फवारणी यानंतर हातातोंडाशी आलेला घास पावसाने हिरावून नेला आहे.

मराठवाड्यात शेतीसह पशुधनाचेही नुकसान मोठे आहे. शेतर्कयांची जनावरे वाहून गेली आहेत. शेतीचे बांध, दावे, पाण्याच्या पाटाचेही नुकसान झाले असून शेतर्कयांना पुन्हा नव्याने सुरुवात करावी लागणार आहे. शेतातील ओल संतुलित झाल्याशिवाय पुढची पेरणीही शक्य नाही. त्यातून पुढच्या पेरणीत बियाण्यांना बुरशीचा धोका आहे. सोयाबीन, कपाशी, तुरीचे अपरिमित नुकसान झाले आहे. पिकासोबतच जमिनीची उत्पादनक्षमता नाहीशी झाली आहे. त्यामुळे या नुकसानाचे आव्हान पुढे बराच काळापर्यंत कायम राहाणार आहे. पावसामुळे महत्त्वाचे रस्ते बंद झाल्याने शेतर्कयांना मिळणारी तातडीची मदत वेळीच पोहचवण्यात अडचणी येत आहेत. शेतर्कयांवरील कजार्चे ओझे वाढले आहे. उत्पादन खर्च आणि व्यावहारिक कमाई यातील तुटवडा मोठा आहे. मराठवाड्यातील काही भागात पीक पाहणी करणे कठीण झाले आहे. अशा परिस्थितीत येत्या काळातील पेरणीसाठी सुयोग्य पिकाची निवड करण्यासाठी कृषी विभाग आणि कृषी संशोधकांनी महत्त्वाचे मार्गदर्शन करण्याची गरज आहे. पिकाच्या नुकसानाचे अचूक मापन करर्णाया यंत्रणेची कसोटी लागणार आहे. मराठवाड्यात अतिवृष्टीमुळे जीवितहानीही झाली असून जवळपास दोनशे जनावरांचा बळी गेला असून कित्येक घरांचे नुकसान झाले आहे. धाराशीव जिल्ह्यातील काकासाहेब सोनवणे या तरुण शेतर्कयाने तीन एकर शेतीत सोयाबीन लावले होते, जवळपास १ लाख रुपये खर्च पेरणी फवारणीपर्यंत आला होता. सप्टेंबर महिन्यात पीक व्यवस्थित आले होते. सप्टेंबर महिन्याच्या अखेरीस कापणी होणार होती. पण त्याआधी पिकावर हळद्या रोग आला होता, सोयाबीनची पाने पिवळी होत असल्याने त्या चिंतेत होतो. त्यानंतर औषध



फवारणी केली. हे संकट गेले नव्हते तोच पावसाचे संकट उभे ठाकले. जवळपास शंभर टक्के पीक हाती पडण्याची शक्यता होती. मात्र आता पावसाने पूर्ण शेतात गुडघाभर पाणी झालं आहे. त्यामुळे हातातोंडाशी आलेलं पीक वाहून गेले. झालेल्या नुकसानाची पीक विम्याचा ई पीकपाणी या वेबसाईटवर नोंद केली आहे. २० ऑक्टोबरपर्यंत अद्याप पाहणी करायला कृषी अधिकारी किंवा इतर संबंधित विभागाचे कर्मचारी शेतात पोहचले नाहीत. त्यामुळे पंचनामा झालेला नाही. जोरदार पावसामुळे जमिनीचा कस वाहून गेला आहे, माती वाहून गेली आहे. खरीप हंगाम हातचा पूर्णपणे गेला आहे. ऑक्टोबरमध्ये पाऊस थांबला तर रब्बीचा विचार होऊ शकतो, मात्र पाऊस असाच सुरू राहिल्यास त्याचीही शाश्वती नाही. आता सोयाबीन लावले होते, सोयाबीन लावलेल्या जवळपास सगळ्यांच्या शेतात पाणीच पाणी झाले आहे. अशी माहिती गाव मसा खांडेश्वरी, जिल्हा धाराशीव, तालुका कळंब येथील तरुण शेतकरी काकासाहेब अनंतराव सोनवणे यांनी दिली. खरीपाचं पीक वाहून गेल्याने रब्बीसाठी आता हातात काही उरले नाही. त्यामुळे आता रब्बीमध्ये कशी पेरणी करायची ही चिंता आहे, अशी हतबलता शेतकरी काकासाहेब सोनवणे यांनी व्यक्त केली.

धाराशिवमध्ये ८१, जालना जिल्ह्यात ४० जनावरे दगावली असून दूध देर्णाया जनावरांपैकी ९८ मोठी आणि ८६ लहान जनावरे, तर वजन ओढणारी २५ मोठी आणि ७ लहान जनावरे दगावली आहेत. मराठवाड्यात ८०० हून अधिक मालमत्तांची पडझड झाली आहे. यात धाराशिवमध्ये ६११, लातूर जिल्ह्यात ८९, छत्रपती संभाजीनगर परिसरात ७३, नांदेडमध्ये ५६, परभणीत ४२ आणि जालन्यात २१ घरांचे नुकसान झाले आहे. संभाजीनगरात चार रस्त्यांचे मोठे नुकसान झाले आहे. तर मराठवाड्यात एकूण ९ पुलांचे नुकसान झाले असून छत्रपती संभाजीनगरमध्ये चार, बीडचे चार आणि परभणीतील एका पुलाचा समावेश आहे. धाराशिवमध्ये सहा शाळांचे, संभाजीनगरात दोन शाळांचे नुकसान झाले आहे.

अतिवृष्टीचे संकट कायम असताना गोदावरीला आलेल्या पुरामुळे संभाजीनगरातील जायकवाडी धरणात पाणीसाठा वाढला आहे. त्यातच जायकवाडीतही जोरदार पावसामुळे जवळपासच्या जिल्ह्यातील शेतर्कयांची चिंता कायम आहे. हे जादा पाणी आल्याने जायकवाडी धरणाचे २७ दरवाजे उघडण्यात आले आहेत. पुढे नांदेड जिल्ह्यातही पाऊस सुरू असल्याने या ठिकाणीही गोदावरी नदी दुथडी भरून वाहत असून शेतात साचलेले पाणी ओसरण्याची चिन्हे नाहीत. अशा परिस्थितीत महाराष्ट्रातील पूरस्थितीवरून राजकारण सुरू झाले आहे. लाडकी बहीण योजनेमुळे राज्यावर असलेला आर्थिक बोजा कमी करण्याचे प्रयत्न होत असताना पूरग्रस्तांच्या मदतीसाठी केंद्राच्या निधीवर अवलंबून राहावे लागत आहे. पुरामुळे संसारसाहित्यही वाहून गेल्याने नागरिक रस्त्यावर आले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी औसा तालुक्यातील उजनी आणि निलंगा तालुक्यात अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानाची नुकतीच दौयादरम्यान पाहणी केली. यावेळी सर्व निकष बाजूला ठेवून शेतर्कयांना सरसकट मदत करण्याची घोषणा करण्यात आली. नुकसानग्रस्तांच्या मदतीसाठी २ हजार २०० कोटींचा पहिला हप्ता मंजूर झाला असल्याचे ते म्हणाले. तर दिवाळीपूर्वीच सर्व शेतर्कयांना मदत मिळेल असेही मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले. मात्र ही मदत मिळताना येर्णाया तांत्रिक अडचणी कमी करण्याची गरज आहे. पहिला हप्ता दिल्यावर त्यापुढील हप्त्यांचे नियोजनात लाडकी बहीण योजनेसारखीच कपात झाल्यास शेतर्कयांना दिलासा मिळणार नाही. पावसाचा हंगाम जरी हातचा गेला असला तरी त्यापुढील पेरणीसाठी शेतर्कयांना पुन्हा उभे करण्याची गरज आहे. कोरड्या दुष्काळापेक्षा ओला दुष्काळ सुसह्य मानला जातो. जमिनीची ओल कायम राहिल्याने पुढील काही महिने किंवा वर्षे जमिनीत पाणी झिरपल्याने पाणी टंचाईची स्थिती निर्माण होणार नाही. या संकटातही या संधीचा लाभ घेण्यासाठी सरकारी पातळीवर पुरेशा नियोजनाची गरज आहे.

धाराशिवमध्ये भूम तालुक्यात काढणीला आलेले कापूस, सोयाबीन, ज्वारी, मका, भुईमूग आदी पिके उद्ध्वस्त झाली आहेत. मात्रेवाडीतील शेतर्कयाने आत्महत्या केल्याच्या घटनेनंतर या ओल्या संकटानंतर शेतर्कयांच्या आत्महत्यांचे सत्र सुरू होण्याचा धोका आहे. सर्वच नागरिकांनी शेतर्कयांच्या पाठीशी उभे राहाण्याची गरज आहे. या पावसामुळे अन्नधान्य, भाजीपाल्याचा तुटवडा निर्माण होणार असल्याने जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती वाढण्याची शक्यता गृहीत धरता त्याचा काळाबाजार किंवा साठेबाजीलाही ऊत येणार आहे. शेतर्कयांच्या हतबल स्थितीचा फायदा घेणारे घटक सक्रिय होण्याची शक्यता आहे. त्यावरही सरकार आणि नागरिकांनाही लक्ष ठेवावे लागणार आहे. अतिवृष्टीमुळे ज्यांच्या शेतातील माती वाहून गेली आहे, अशा जमिनीचा पोत पूर्ववत होण्यासाठी किमान वीस वर्षे लागतील, अशी शक्यता असल्याने हे संकट दूरगामी परिणाम करणारे ठरणार आहे. शेतीचे बांधबंधारे, पाटबंधारे विभागाकडून झालेल्या दुर्लक्षाचा फटका बसलेल्या शेतर्कयांनी संबंधितांवर कारवाईची मागणी केली आहे. सोबतच झालेल्या नुकसानाचा प्रत्यक्ष पाहणी डेटा गोळा करतानाही काळजी घ्यावी लागणार आहे. यात बोगस लाभार्थ्यांचीही भर पडण्याची शक्यता आहे. सरसकट मदतीतील हा धोका वेळीच ओळखायला हवा. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भुलवर्णाया आणि वस्तुस्थितीपासून कोसो दूर असलेल्या आश्वासने, घोषणांचा पाऊस रोखायला हवा. नुकसानाचा अचूक डेटा मिळवण्यासाठी जिल्हा आणि पंचायत प्रशासनाने स्वतः यात काटेकोर लक्ष घालण्याची गरज आहे, अन्यथा पूरग्रस्त शेतर्कयांची मदत इतरांच्या घशात जाईल. तात्काळ पंचनामे, पीकविमा दावे त्वरित मंजूर व्हायला हवेत. कर्जमाफी प्रभावी व्हायला हवी, हमीदरातील त्रुटी कमी व्हायला हव्यात, बँकांच्या कर्ज वसुली तगाद्यावर उपाय हवा तसेच व्याजमाफीचाही पर्याय आहे. महाराष्ट्रातील शेतर्कयांवर आलेल्या संकटातून शेतर्कयाला उभे करण्यासाठी राज्यातील प्रत्येक नागरिकाने प्रयत्न करायला हवेत. वित्तीय संस्था, खासगी कंपन्या, उद्योग, व्यवसाय तसेच आर्थिकदृष्ट्या संपन्न असलेल्या घटकांनी आपापल्या परीने शेतर्कयासाठी मदत द्यायला हवी. ही मदत देताना त्यातील पारदर्शकता जपायला हवी. पूरपरिस्थितीचे राजकारण न करता शेतर्कयांचे अश्रू पुसण्याची खरी गरज आहे.

# वंचितांसाठी समन्यायी आरक्षण



**दि**वसेंदिवस उग्र होणारी आर्थिक विषमता, जातीय-धार्मिक विसंवाद आणि निसगार्चा विध्वंस या देशासमोरील मोठ्या समस्या आहेत. खेदाची बाब म्हणजे सध्या शाहू-फुले-आंबेडकरांचा महाराष्ट्र यामुळे अस्वस्थ आहे. मराठा समाजाला आरक्षण आणि ओबीसी आरक्षणाचे रक्षण यासाठी आंदोलने, प्रति-आंदोलने होत आहेत, त्यामुळे राज्यभर तणावाची स्थिती आहे. याचे मूळ आणि मुख्य कारण म्हणजे जमिनीवर प्रत्यक्ष राबणाऱ्या शेतकऱ्यांसह कष्टकऱ्यांची स्थिती अत्यंत दयनीय आहे. राज्यातील १४ कोटी लोकसंख्येपैकी ७२ टक्के म्हणजेच १० कोटी लोक दैन्यावस्थेत जगत आहेत. संविधानाने प्रत्येक नागरिकाला जीवनाचा अधिकार हा मूलभूत हक्क बहाल केला आहे. २१ व्या कलमाने प्रदान केलेल्या या अधिकाराचा न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार विस्तार करून राज्यव्यवस्थेने सर्व मानवी मूलभूत गरजा आणि सोयी सुविधांच्या तरतुदी आणि पूर्ततेचे दायित्व सोपवले आहे. संविधानाच्या उद्देशिकेत सर्व नागरिकांना दर्जा आणि संधींच्या समानतेची हमी दिली असली, तरी स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांनंतरही दारिद्र्य, कुपोषणासह मूलभूत बाबींचा अभाव अक्राळविक्राळ स्वरूपात सर्वत्र बघावयास मिळतो. झोपडपट्ट्यांत राहणारे सर्वाधिक लोक महाराष्ट्रात आहेत. दलित , आदिवासी आणि भटक्याविमुक्तांची स्थिती राज्यात फार दयनीय आहे. राज्याचे उत्पन्न ४५ लाख कोटी रुपये असून, ते देशात सर्वाधिक आहे. मात्र, राज्यातील ७० टक्के कुटुंबाचे दरमहा उत्पन्न २० हजार रुपयांपेक्षा कमी आहे.

थोडक्यात राज्यातील शेतकरी, शेतमजूर, वनकामगार, मासेमारी, बांधकाम, घरकाम करणारी; तसेच लहानमोठे स्वयंरोजगार करत जगणारे तमाम कष्टकरीही दैन्यावस्थेत आहेत. या सर्व वंचित, उपेक्षितांना आरक्षणासह सर्व आर्थिक सेवासवलतीची नितांत गरज आहे. तथापि, या सर्वांचा एकत्रित विचार करून त्यांच्या मूलभूत गरजा भागविणे आणि आर्थिक स्तर उंचावणे यासाठी समान संधी मिळावयास हवी. महत्त्वाची बाब म्हणजे आरक्षणाच्या प्रश्नावरून मराठा आणि ओबीसी जात समूहांमध्ये आपसात तेढ निर्माण व्हावयास नको, याची पुरेपूर काळजी घेणे शक्य आणि आवश्यक आहे. पांढरपेशा रोजगार ठप्प राज्यात आजमितीला नऊ कोटी लोक ३५ वर्षांपेक्षा कमी वयाचे आहेत. त्यातील १८ ते ३५ या वयोगटातील एक कोटींहून अधिक स्त्री-पुरुष ना शिक्षणात आहेत, ना रोजगारात, ना प्रशिक्षणात. त्यातील २० ते २५ टक्के मराठा समाजाचे आहेत. या सर्वांना सरकारी व अन्य सार्वजनिक रोजगार मिळण्याची सूतराम शक्य नाही. या क्षेत्रात सध्या वर्षाला लाखभरदेखील नवीन नोकऱ्या निर्माण होत नाहीत. ही रिक्तपदे भरण्यास सरकार चालढकल करत आहे. राज्यातील लाखो लोक लहान-मोठ्या शासकीय नोकऱ्यांसाठी वर्षानुवर्षे स्पर्धा परीक्षा देत आहेत. त्यातील प्रत्यक्षात नोकरी प्राप्त करणाऱ्यांचे प्रमाण एक टक्क्यापेक्षाही कमी असते. आरक्षणामुळे त्यात काहीही विशेष फरक पडणार नाही. गरीब कुटुंबांतील मुले-मुली ज्या शाळा, महाविद्यालयात शिक्षण घेतात, तेथे त्यांचा पाया सक्षम होत नाही. त्यांना पदवी मिळते; शिक्षण नाही. एकंदरित प्रचलित शिक्षण व्यवस्था ही अत्यंत सुमार असून, विद्यार्थ्यांना कसब, कौशल्य आणि जीवनदृष्टी देत नाही. परिणामी, केवळ पदवी प्रमाणपत्र हातात असणे निरर्थक ठरते. अर्थात, त्याच प्रमाणपत्राआधारे काहींना नोकरी मिळते आणि मग ते जनतेची अडवणूक, लूट करत राहतात. त्यामुळे नाना खटपटी लटपटी करून नोकरी मिळविण्यात सर्व गुंग असतात. कष्टकऱ्यांचे हाल, दैन्य वाढत जाते आणि संघटित क्षेत्रातील नोकरदार वर्ग (आजच्या आरक्षणामुळे सर्व जातजमातीतून आलेला) सुखासीन, मालामाल होत असल्यामुळे त्यात समाविष्ट होण्यासाठी आटापिटा होत आहे. यावर उपाय म्हणजे सर्व वंचितांना मूलभूत गरजा देण्याची वेळ आली आहे.

आरक्षण टक्केवारी मयार्दा : संविधानात आरक्षण महत्तम टक्केवारी ५० टक्के असून, ती वाढविण्यास सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला आहे. तथापि, संसदेच्या विवक्षित संशोधन कायद्याने ती वाढवून घेता येईल, असे घटनातज्ज्ञांचे मत आहे. किमान गरजा पूर्ततेची हमी : आरक्षणाचे मुख्य उद्दिष्ट लक्षित समूहांना शिक्षण आणि रोजगारांच्या संधी उपलब्ध करून देणे, जीवनमान सुधारणे हे आहे. मात्र, सार्वजनिक क्षेत्रातील रोजगार गरजेच्या तुलनेत अत्यंत कमी असल्यामुळे विविध आरक्षण गटातील सर्व गरजूंना नोकरी मिळणे कदापिही शक्य नाही. भरीसभर म्हणजे संपत्ती आणि उत्पन्नाची विषमता स्वातंत्र्योत्तर काळात लक्षणीय प्रमाणात वाढली. २०२५च्या आकडेवारीनुसार वरच्या एक टक्का लोकांकडे देशातील ४० टक्के संपत्ती आणि २२ टक्के राष्ट्रीय उत्पन्न एकवटले आहे. याउलट तळाच्या ५० टक्के लोकांकडे (देशात एकूण ७३ कोटी लोक आण राज्यात सात कोटी) जेमतेम तीन टक्के संपत्ती असून, आत्यंतिक काबाडकष्ट करून त्यांना फक्त १५ टक्के राष्ट्रीय उत्पन्न मिळते. मुख्यतः असंघटित क्षेत्रात जोखमीचे रोजगार; ज्यामध्ये किमान उत्पन्नाची हमी आणि सुरक्षाकवच नसलेल्या या श्रमिकांचे दरमहा कौटुंबिक उत्पन्न पंधरा हजार रुपयांपेक्षा कमी आहे. यामध्ये अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती हे तर मोठ्या संख्येने आहेतच; सोबतच ओबीसी आणि मराठा शेतकरी आणि अन्य श्रमिक समुदाय हे सर्वही वंचित आहेत. स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळी देशाची अत्यंत विषम सामाजिक-आर्थिक स्थिती होती, त्यावर उपायवजा आरक्षणाची तरतूद ऐतिहासिक आणि पारंपरिकरीत्या जे वंचित आणि उपेक्षित आहेत, त्यांच्यासाठी संविधानकारांनी अग्रक्रमाने केली. सोबतच देशातील सर्व साधनसंपत्तीचा विनियोग व्यापक जनहितासाठी व्हावा अशा तरतुदीही संविधानात केल्या. खेदाची बाब आहे, की आजही देशातील १०० कोटी आणि राज्यातील १० कोटी लोक अभावग्रस्त अवस्थेत जगण्यास मजबूर आहेत.

आमूलाग्र व्यवस्था परिवर्तन : संविधानात अधोरेखित दर्जा आणि संधीची समानता फलद्रूप झाली नाही. जन्माधिष्ठित असमानता, विषमता, अभावग्रस्तताच बहुसंख्य लोकांचे जगणे कसे असेल, हे ठरविते. या सर्व वंचितांना मानवी जीवनाची हमी, सेवासुविधा पुरविणारे आरक्षण, सामाजिक सुरक्षा, उत्पन्न आणि रोजगार हमी राज्याने द्यावी हा संविधानाचा पाया आणि गाभा आहे. आरक्षण या व्यापक समान संधीचा लाभ घेण्यासाठी सध्या शक्य आणि आवश्यक असलेली विशेष संधी आहे. अहिंसक मार्गाने समतामूलक शाश्वत विकास साध्य करण्याचे साधन मानून मालमत्ताधीश, न्यायाधीश आणि सत्ताधीशांनी यास सर्वोच्च प्राधान्य देऊन महत्तम समन्यायी मार्गाने सर्वांना नवराष्ट्र उभारणीमध्ये सहभागी करून घेतले पाहिजे.

# माता सिद्धिदात्री



महागौरी माता सिद्धिदात्री ही हिंदू देवी दुर्गेचे नववे आणि शेवटचे रूप आहे, ज्याची पूजा नवरात्रीच्या शेवटच्या दिवशी केली जाते. तिच्या नावाचा अर्थ पूर्णता देणारी (सिद्धी = परिपूर्णता, धात्री = देणारी) आहे आणि ती तिच्या भक्तांना आध्यात्मिक शक्ती, ज्ञान, पूर्णता आणि गूढ क्षमता प्रदान करण्यासाठी ओळखली जाते. तिचे चार हात शंख, चक्र, गदा आणि कमळ धरलेले आहेत.

प्रमुख पैलू

दुर्गेचे नववे रूपः ती नवदुर्गेतील (दुर्गेची नऊ रूपे) अंतिम प्रकटीकरण आहे.

पूर्णतेची देवीः तिचे नाव, सिद्धिदात्री, आध्यात्मिक आणि दैवी सिद्धी किंवा सिद्धी देणाऱ्या तिच्या भूमिकेचे प्रतीक आहे.

मूळ रूपः तिला विश्वातील जीवनाचा उदय झालेल्या प्रकाश आणि तेजाचे पहिले एकक, वैश्विक शक्तीचे (आदि शक्ती) मूळ रूप मानले जाते.

बुद्धी आणि पूर्णता देणारीः ती बुद्धी, आनंद, यश आणि दैवी आकांक्षांची पूर्तता देते.

शिवाशी संबंधः काही वैदिक शास्त्रांनुसार, भगवान शिव यांनी तिची पूजा करून सर्व सिद्धी प्राप्त केल्या आणि ती त्यांच्या शरीराच्या डाव्या अर्ध्या भागातून उद्भवली असे मानले जाते.

चित्रण आणि पूजा

प्रतिमाः तिचे चार हात असून, तिच्याकडे शंख (शंख), चक्र (चक्र), गदा (गदा) आणि कमळाचे फूल (पद्म) आहे.

भक्तः देव (देव), राक्षस (असुर) आणि मानव या तिन्ही जगातील प्राणी तिची पूजा करतात.

महत्त्व

आध्यात्मिक ज्ञानः ती अजना (तिसरा डोळा) आणि सहस्त्रार (मुकुट) चक्रांचे नियंत्रण करून भक्तांना उच्च ज्ञान आणि दैवी संबंधाकडे मार्गदर्शन करते.

वैश्विक प्रशासनः तिला जगाची महिला प्रशासक म्हणून पाहिले जाते, ज्याने हिंदू त्रिमूर्ती (ब्रह्मा, विष्णू आणि शिव) साठी दैवी पत्नी निर्माण केल्या आहेत.

नवरात्रीचा शेवटचा दिवसः तिची पूजा नवरात्र उत्सवाच्या समाप्तीला चिन्हांकित करते, जो मातृदेवतेच्या नऊ रूपांचा सन्मान करतो.

# माता कालीची मूर्ती घरामध्ये ठेवावी की नाही?



देवी भागवत आणि कालिका पुराण यासारख्या ग्रंथांमध्ये काली देवीचे वर्णन शक्ती आणि उग्र रूप असलेली देवी म्हणून केले आहे. या ग्रंथांमध्ये त्याचे स्वरूप, उपासना आणि शक्ती यांचे सविस्तर वर्णन आहे. मात्र, मूर्ती घरात ठेवावी की नाही याबाबत शास्त्रात स्पष्ट मार्गदर्शक तत्त्वे नाहीत. बहुतेक वर्णने त्यांच्या शक्ती स्वरूप, विनाशकारी आणि संरक्षणात्मक गुणधर्मांवर लक्ष केंद्रित करतात. तंत्र आणि शक्तीपूजेच्या ग्रंथांमध्ये असे म्हटले आहे की माँ कालीच्या काही उग्र रूपांची पूजा विशेष विधींनी आणि प्रशिक्षित पंडित/गुरूच्या देखरेखीखाली केली जाते. या ग्रंथांमध्ये अशी रूपे घरात ठेवण्याची किंवा सर्वसाधारणपणे पूजा करण्याची सूचना दिलेली नाही, त्यानुसार मूर्तीची प्रतिष्ठापना केल्यास उपासनेची पद्धत, वेळ आणि पद्धत यांची काळजी घेणे आवश्यक मानले जाते.

वास्तुशास्त्राचा दृष्टिकोन वास्तु शास्त्रात असे म्हटले आहे की पूजा घरात देवी-देवतांच्या मूर्ती शांती आणि सकारात्मक ऊर्जा निर्माण करतात. काही तज्ज्ञांच्या मते, माता कालीचे उग्र रूप यासारख्या उग्र किंवा भयानक दिसणाऱ्या प्रतिमा योग्य दिशा आणि पद्धतीशिवाय घरात ठेवल्यास उर्जा संतुलनावर परिणाम होऊ शकतात. वास्तुनुसार मूर्ती पूर्व किंवा ईशान्य दिशेला ठेवणे शुभ मानले जाते. मूर्ती जमिनीच्या वर आणि स्वच्छ ठिकाणी ठेवावी. पुतळ्याचा आकार फार मोठा नसावे, लहान आकाराच्या मूर्ती घरासाठी योग्य मानल्या जातात. या सर्व सूचना पारंपारिक वास्तु आणि गृहपूजा परंपरांवर आधारित आहेत.

लोककथा आणि धार्मिक प्रथा काही धार्मिक परंपरांचा असा विश्वास आहे की जर देवी कालीच्या मूर्तीचा नियमितपणे आदर आणि पूजा केली गेली नाही तर ते घरात नकारात्मक परिणाम निर्माण करू शकते. त्याचबरोबर विधीवत पूजा-पाठ आणि स्वच्छ राखण यांमुळे घरात सकारात्मक ऊर्जा कायम राहते, असे भक्तांच्या अनुभवांवरून दिसून येते. देवीच्या मूर्ती नेहमी स्वच्छ, सुरक्षित आणि सन्मानजनक ठिकाणी ठेवाव्यात, असेही अनेक धार्मिक लेखांमध्ये नमूद आहे. तुटलेले किंवा खराब झालेले पुतळे ठेवण्यापासून परावृत्त करण्याचा सल्ला दिला जातो.

धर्मग्रंथ आणि परंपरांचे सार धर्मग्रंथात माता कालीचे वैभव, सामर्थ्य आणि स्वरूप यांचे वर्णन आढळते; मूर्ती स्थापनेसाठी स्पष्ट सूचना नाहीत. तंत्र ग्रंथांमध्ये : काही स्वरूपांमध्ये विशेष पद्धत आणि गुरूमार्गदर्शनाची आवश्यकता असते. वास्तु आणि पूजा परंपराः मूर्तीचे अचूक स्थान, दिशा, आकार आणि पद्धत महत्वाची आहे. लोककथा : कर्मकांड व आदरयुक्त उपासना यांद्वारेच घरात सकारात्मक प्रभाव पडतो.

या विषयावर उपलब्ध असलेल्या शास्त्रीय, तांत्रिक आणि स्थापत्य दस्तऐवजांनुसार काली देवीची मूर्ती योग्य रितीने, आदर आणि योग्य दिशेने स्थापित केल्यास घरात ठेवली जाऊ शकते. धर्मग्रंथ स्वतः साठी स्पष्ट होण्यासाठी किंवा पाळण्यासाठी मयार्दा निश्चित करत नाहीत, त्याऐवजी परंपरा आणि वास्तु सल्ला सांगते की अग्निमय रूपाच्या मूर्तीसह सावधगिरी बाळगली पाहिजे.

# तुमच्याही देवघरात शंख आहे? मग या चुका टाळाच, जाणून घ्या वास्तुशास्त्र काय संगतं?



आपल्या जीवनात वास्तुशास्त्राचं खूप महत्त्व आहे. हिंदू धर्मशास्त्रानुसार तुम्ही जेव्हा कोणतंही काम करता, ते काम जर तुम्ही वास्तुशास्त्रांचे सर्व नियम पाळून केलं तर त्याचं दुप्पट फळ मिळतं, अशी मान्यता आहे. तुमच्या घरात वास्तुदोष असेल किंवा तुम्ही जर एखादं काम करताना वास्तुशास्त्रामध्ये सांगण्यात आलेल्या नियमांचं व्यवस्थित पालन केलं नाही तर तुमच्या घरात नकारात्मक ऊर्जा निर्माण होऊ शकते, तुम्ही जे काम करणार आहात त्यामध्ये अडचण निर्माण होऊ शकते. मात्र तुम्ही जे काम करणार आहात, त्या कामापूर्वी वास्तुशास्त्राचे नियम लक्षात घेतल्यास घरात सरकारात्मक ऊर्जा निर्माण होते, आणि याच सकारात्मक ऊजेर्चा परिणाम हा तुमचं काम पूर्ण करण्यास मदत करतो. तुम्ही जर तुमच्या देवघरात शंख ठेवला असेल तर त्याच्याशी संबंधीत नियम काय आहेत? आणि देवघरात शंख ठेवताना काय काळजी घ्यावी? याबद्दलची माहिती आज आपण जाणून घेणार आहोत.

देवघरात ठेवलेला शंख हा फक्त पूजा करतानाच वाजवा झ्र वास्तुशास्त्रानुसार ज्या शंखाचा उपयोग हा पूजेसाठी केला जातो किंवा तो तुमच्या देवघरात आहे, असा शंख हा केवळ पूजा करतानाच त्याचा शंखनाद करावा, कारण नसताना आणि केव्हाही हा शंख वाजवू नये, यामुळे घरात वास्तुदोष निर्माण होतात.

शंखाची साफ सफाई झ्र तुम्ही तुमच्या देवघरात जो शंख ठेवला आहे, तो नेहमी स्वच्छ ठेवा, त्याची नियमित स्वच्छता करा, पाण्यात गंगेचं पाणी मिसळून नंतर या शंखाची स्वच्छता करा.

शंख जमिनीवर ठेवू नका झ्र वास्तुशास्त्रानुसार शंख कधीही जमिनीवर ठेवू नये, त्यामुळे तुमच्या घरात वास्तुदोष निर्माण होतो. अनेक प्रकारच्या समस्या निर्माण होऊ शकतात.

शंखाचं मुख झ्र वास्तुशास्त्रानुसार देवघरात शंख ठेवताना नेहमी त्याचं मुख वरच्या दिशेला ठेवावं, त्यामुळे घरात सकारात्मक ऊर्जा निर्माण होते.

शंखाची दिशा - देवघरात शंख कोणत्या दिशेला ठेवावा? हे देखील वास्तुशास्त्रात सांगितलं आहे, वास्तुशास्त्रानुसार देवघरात शंख देखील त्याच दिशेला ठेवा ज्या दिशेला तुमचं देवघर आहे. तुम्ही उत्तर -पश्चिम दिशेला देखील शंख ठेवू शकता. जर तुम्ही वास्तुशास्त्रांच्या या नियमांचं पालन केलं तर तुमच्या घरात धनाचा वर्षाव होईल, माता लक्ष्मीची कृपा नेहमी तुमच्यावर राहील असं वास्तुशास्त्र सांगतं.

# घटस्थापनेच्या परडीतील उगवलेले धान्य काय संकेत देते?



नवरात्रीत घटस्थापना करण्याची पद्धत आहे. मात्र नऊ दिवसानंतर जेव्हा घटातील हे धान्य उगवते तेव्हा ते धान्य आपल्याला काही संकेत देते. तुमची नवरात्रीची पूजा किती यशस्वी झाली आणि भविष्य तुमच्यासाठी कोणता संदेश घेऊन आले आहे हे उगवलेले घटाचे धान्य आपल्याला सांगते. शकुन शास्त्रामध्ये अंकुरित घटाच्या धान्याच्या रंगांवरून भविष्य जाणून घेण्याचे वर्णन मिळते. नवरात्रीच्या पहिल्या दिवशी धान्य पेरून आपण दुर्गा देवीसमोर आपल्या सुखी जीवनाची कामना करतो. नवरात्रीच्या या पवित्र पर्वात कलश स्थापनेच्या वेळी जे भक्त दुर्गा सप्तशतीचे पाठ करतात आणि नवरात्रीचे व्रत पाळतात ते मातीच्या कलशात धान्य पेरतात. हे धान्य तिसऱ्या दिवसापर्यंत अंकुरित होतात. हे अंकुरित धान्य खूप शुभ मानले जातात. या धान्याच्या अंकुरांना पाहून संपूर्ण वर्षाचे भविष्य सांगितले जाते. तसेच आपली पूजा यशस्वी झाली की नाही याचीही पूर्ण माहिती या उगवलेल्या धान्याच्या माध्यमातून मिळते.

घटात कोणत्या रंगाचे उगवलेले धान्य काय संकेत देते पाहुयात

जर धुळीसारख्या किंवा धुरासारख्या रंगाचे धान्य उगवले तर ते कुटुंबात होणाऱ्या भांडणांची किंवा कलहाची सूचना देते.

जर अंकुरित धान्यमध्ये काळ्या रंगाचे अंकुर उगवले तर ते वर्षभर घरात गरिबी किंवा दारिद्र्य राहील असे दर्शवते.

जर धान्य अजिबात उगवले नाही तर त्या वर्षी कामांमध्ये अडथळे येण्याची आणि कुटुंबातील एखाद्या व्यक्तीचा अचानक मृत्यू होण्याची शक्यता असते.

जर लाल रंगाचे अंकुर उगवले तर ते रोग आजारपण किंवा शत्रूपासून भीती असण्याचे संकेत देतात.

हिरव्या रंगाचे अंकुर धन आणि धान्याचे सूचक मानले जातात. हिरव्या रंगाचे अंकुरित धान्य हे दुर्गा मातेने तुमची पूजा स्वीकार आहे याचे प्रतीक आहे.


पांढरा रंग अत्यंत शुभ मानला जातो. हा रंग साधकाला त्याच्या इच्छित सिद्धीची (मनोकामना पूर्ण होण्याची) दिशा दाखवतो.

अर्धे हिरवे आणि अर्धे पिवळे अंकुर उगवले तर ते सुरुवातीला काम यशस्वी होईल आणि नंतर त्यात काही नुकसान होईल असे सूचित करतात.

नवरात्रीतील घटाच्या अंकुराचा देश दुनियावर काय परिणाम होईल ते देखील भविष्याचे संकेत देते

नवरात्रीत देवीच्या मंदिरातील घटात उगवलेल्या धान्याच्या अंकुरांना पाहून ज्योतिषी केवळ व्यक्तीच्या भविष्यावरच नाही तर संपूर्ण राष्ट्रावर काय परिणाम होईल याचीही भविष्यवाणी करतात. सिद्धांत शेखर आणि सारस्वत या प्राचीन ग्रंथांनुसार धान्याचे अंकुर जर काळे असतील, तर 'वृष्टी' कमी होईल. जर अंकुर गढूळ किंवा फिकट असतील तर देशात अंतर्गत आणि बाह्य कलह होतील. जर ते अविकसित लहान असतील तर जन नाश म्हणजेच लोकांचे मृत्यू जास्त प्रमाणात होतील. जर धान्य गडद किंवा काळसर असतील तर दुष्काळ येईल असे मानतात. जर ते वाकडे उगवले असतील तर व्याधी,आजार वाढतील. आणि जर ते अंकुर खाली झुकलेले असतील तर शत्रूपासून भय निर्माण होईल अशा प्रकारे शकुन शास्त्रातून हे सर्व संकेत समजून घेतले जातात.

# पापंकुशा एकादशीला 'या' ठिकाणी दिवे लावल्याने आर्थिक अडचणींपासून मिळते मुक्तता



आपल्या सनातन धर्मात एकादशी तिथीला खूप महत्त्व आहे. हे व्रत भगवान विष्णूंना समर्पित आहे. अशातच एका वर्षात 24 एकादशी असतात आणि या दिवशी भगवान विष्णूची पूजा करण्याची परंपरा आहे.पण प्रत्येक एकादशीला व्रत करण्याचा प्रभाव वेगळा असतो. यामध्ये एक म्हणजे पापंकुशा एकादशीचे व्रत आश्विन महिन्याच्या शुक्ल पक्षाच्या एकादशी तिथीला केले जाते. त्याच्या नावावरूनच पाप म्हणजे पाप आणि अंकुश म्हणजे थांबणे असा अर्थ असल्याने ही एकादशी सर्व पापांचा नाश करते आणि पुण्य फळे देते. भगवान विष्णूची पूजा आणि उपवास करण्यासोबतच तुम्ही काही खास ठिकाणी दिवे लावण्याची परंपरा देखील आहे . असे मानले जाते की असे केल्याने भगवान नारायण प्रसन्न होतात आणि त्यांचे अनंत आशीर्वाद आपल्याला मिळतात.

घराचे मुख्य प्रवेशद्वार

पापंकुश एकादशीला घराच्या मुख्य प्रवेशद्वारावर दिवा लावणे खूप शुभ मानले जाते. या दिव्यामुळे घरात सकारात्मक ऊर्जा येते. शिवाय भगवान विष्णूच्या आशीवार्दाने घरातून नकारात्मक ऊर्जा दूर होतात.

तुळशीचे रोप

तुळशीला भगवान विष्णूंची प्रिय मानली जाते. असे म्हटले जाते की एकादशीला तुळशीच्या रोपाजवळ गायीच्या तुपाने भरलेला दिवा लावल्याने शाश्वत लाभ होतो. या प्रथेमुळे घरात सुख आणि समृद्धी येते.

देवघर

पापंकुश एकादशीच्या दिवशी घराच्या प्रार्थनास्थळी किंवा मंदिरात दिवा लावावा. हा दिवा भगवान विष्णूंवरील अपार श्रद्धा आणि भक्तीचे प्रतीक आहे. असे म्हटले जाते की हा दिवा रात्रभर तेवत ठेवल्याने भगवान विष्णूंच्या कृपेने सर्व इच्छा पूर्ण होतात.

पिंपळाचे झाड

शास्त्रांनुसार पिंपळाचे झाड भगवान विष्णूंचे निवासस्थान मानले जाते. जर तुमच्या घराजवळ पिंपळाचे झाड असेल तर एकादशीच्या संध्याकाळी त्याखाली दिवा लावा. या विधीमुळे जीवनातील सर्व अडथळे दूर होतात आणि आर्थिक अडचणींपासून मुक्तता मिळते.

स्वयंपाकघर

स्वयंपाकघर हे देवी अन्नपूणार्चे निवासस्थान मानले जाते. एकादशीला स्वयंपाकघरात दिवा लावल्याने घरात कधीही अन्न आणि संपत्तीची कमतरता भासत नाही आणि समृद्धी येते.

कामात प्रगती होईल

जर तुम्हाला कामात सतत समस्या येत असतील तर पापंकुश एकादशीला भगवान विष्णूच्या मंदिरात जाऊन त्यांना पिवळे वस्त्र अर्पण करा. यामुळे तुम्हाला संबंधित समस्यांपासून आराम मिळेल.

# नवरात्रीतील अष्टमी आणि नवमी तिथी केव्हा आहे? जाणून घ्या अष्टमी व नवमीची नेमकी तारीख व पूजाविधी कशी करावी...!

या वर्षी शारदीय नवरात्रीमध्ये एकच तिथी दोनदा आल्यामुळे अष्टमीच्या पूजेबद्दल थोडा गोंधळ निर्माण झाला आहे. शारदीय नवरात्रीचा प्रारंभ २२ सप्टेंबर रोजी झाला असून याची सांगता २ ऑक्टोबर रोजी विजयदशमीला होणार आहे. खरं तर यंदा तृतीया तिथी दोन दिवस आहे. २३ सप्टेंबर आणि २४ सप्टेंबर या दोन्ही दिवशी तृतीया तिथी साजरी केली गेली. यामुळेच आता अष्टमी तिथी २९ सप्टेंबरला साजरी करायची की ३० सप्टेंबरला हा प्रश्न अनेकांना पडला आहे. अष्टमी आणि नवमी तिथीची पूजा कोणत्या दिवशी करणे अधिक शुभ राहील हे आपण आता सविस्तरपणे जाणून घेऊया.

अष्टमी तिथी केव्हा आहे?

पंचांगानुसार, अष्टमी तिथी २९ सप्टेंबर रोजी संध्याकाळी ४ वाजून ३२ मिनिटांनी सुरू होईल. ही अष्टमी तिथी ३० सप्टेंबर रोजी संध्याकाळी ६ वाजून ७ मिनिटांपर्यंत राहील. उदय तिथीनुसार विचार केल्यास, अष्टमीची पूजा ३० सप्टेंबर रोजी केली जाईल. या अष्टमीला दुर्गा अष्टमी असेही म्हटले जाते. दुर्गा अष्टमी हा एक महत्त्वाचा दिवस मानला जातो. यादिवशी दुगार्चे पूजन करून कन्यापूजन देखील केले जाते.

नवमी तिथी केव्हा आहे?

३० सप्टेंबर रोजी संध्याकाळी ६ वाजून ७ मिनिटांपासून नवमी तिथीचा आरंभ होईल. ही नवमी तिथी १ ऑक्टोबर रोजी संध्याकाळी ७ वाजून २ मिनिटांपर्यंत राहील. त्यामुळे नवमी तिथीची पूजा उदय तिथीनुसार १ ऑक्टोबर रोजी करणे योग्य ठरेल. जे भक्त दुर्गा अष्टमीची पूजा करतात त्यांनी ३० सप्टेंबर रोजी कन्या पूजन करावे. आणि जे भक्त नवमीला कन्या पूजन करतात त्यांनी १ ऑक्टोबर रोजी कन्या पूजन करावे असे पंचांग सांगते. यामुळे कन्या पूजनाच्या तारखेबद्दलचा संभ्रमही दूर होतो.

अष्टमी व नवमीची पूजा कशी करावी?

महाअष्टमी आणि नवमीच्या दिवशी काय करावे असा प्रश्न अनेकांना पडतो. महाअष्टमी किंवा दुर्गा अष्टमीच्या दिवशी देवी दुर्गाच्या नवशक्तींपैकी एक असलेल्या महागौरी रूपाची देवीला साजश्रृंगार अर्पण करून नैवेद्य दाखवून विशेष पूजा केली जाते. या दिवशी अनेक भक्त आपल्या घरी हवन करतात. तसेच कन्या पूजनही याच दिवशी केले जाते. ज्यांच्या घरी अष्टमीची पूजा करण्याची परंपरा आहे ते भक्त सप्तमीच्या दिवशी उपवास करतात. त्यानंतर अष्टमीला कन्या पूजन झाल्यावर ते आपला उपवास सोडतात. याउलट ज्या लोकांच्या घरी नवमीची पूजा करण्याची पद्धत आहे ते अष्टमी तिथीला उपवास करतात आणि नवमीच्या दिवशी कन्या पूजन करून आपला उपवास सोडतात. अशा प्रकारे प्रत्येक कुटुंबाच्या परंपरेनुसार अष्टमी आणि नवमीच्या दिवशी पूजा आणि उपवास केला जातो.



अष्टमी तिथीचे महत्व काय?

अष्टमी आणि महाअष्टमीचे महत्त्व खूप मोठे आहे. पौराणिक मान्यतेनुसार अष्टमी तिथीला देवी महागौरीची पूजा केली जाते. देवी महागौरी ही माता पार्वतीने भगवान शंकराला पती म्हणून प्राप्त करण्यासाठी केलेल्या कठोर तपस्येचे प्रतीक आहे. माता पार्वतीने भगवान शंकराला मिळवण्यासाठी खूप कठोर तपस्या केली होती. या तपस्येच्या काळात माता फक्त कंदमुळे, फळे आणि झाडांची पाने खात असे. त्यानंतर तिने फक्त हवा पिऊन तपस्या करणे सुरू केले. तिच्या या अत्यंत कठोर तपस्येमुळे तिला महान गौरव प्राप्त झाले. यामुळेच तिचे नाव 'महागौरी' असे पडले. मातेच्या तपस्येने भगवान शंकर खूप प्रसन्न झाले. त्यांनी तिला गंगेत स्नान करण्यास सांगितले. जेव्हा माता गंगेत स्नानासाठी गेली तेव्हा तिच्या कठोर तपस्येमुळे तिचे स्वरूप श्याम वणार्चे दिसले. तेव्हा तिला 'कौशिकी' असेही म्हटले गेले. नंतर गंगेत स्नान केल्यानंतर तिचे स्वरूप चंद्रासारखे तेजस्वी आणि उज्ज्वल झाले. मातेचे हे तेजस्वी स्वरूप 'महागौरी' म्हणून ओळखले जाऊ लागले. त्यामुळे अष्टमीच्या दिवशी महागौरीची पूजा करणे अत्यंत फलदायी मानले जाते.

# चिकन खाण्यासाठी हट्ट धरणाऱ्या मुलाला संतापलेल्या आईने मारले लाटणे, 7 वर्षांच्या चिमुकल्याचा मृत्यू



■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

पालघर जिल्ह्यातील धनसार येथे एक धक्कादायक आणि आई मुलाच्या नात्याला काळिमा फासणारी घटना समोर आली. एका महिलेने शुल्लक कारणावरून आपल्या 7 वर्षांच्या मुलाचा जीव घेतल्याचे समोर आले आहे. समोर आलेल्या माहितीनुसार, 7 वर्षीय मुलाने आपल्या आईकडे चिकनची मागणी केली होती. पण यानंतर संतापलेल्या आईने मुलाला चपाती लाटायच्या लाटण्याने मारहाण केली. यावेळी डोक्याला जबर मार लागल्याने त्याचा मृत्यू झाल्याचे समोर आले आहे. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. संबधित घटनेची माहिती मिळताच, पालघर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. त्या मुलाचा मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठवण्यात आला. यावेळी, पोलिसांनी 38 वर्षीय आईला अटक केली असून तिच्याविरोधात मुलाच्या हत्येप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पालघर पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे. अशामध्ये पोलिसांनी सांगितले की, मुलाने आईकडे जेवणामध्ये चिकन बनवण्याची मागणी केली होती. या मागणीमुळे संतप्त झालेल्या 38 वर्षिय आईने चिमुकल्याच्या डोक्यावर लाटणीने जोरदार प्रहार केला. हा घाव वर्मी लागल्याने चिमुकल्याच्या डोक्याला गंभीर इजा झाली. यातच त्याचा जागीच मृत्यू झाला.सांगलीमध्ये पतीने पत्नीची हत्या केली. सांगलीतील शांतीनगर परिसरात ही घटना घडली. झोपलेल्या पत्नीवर चाकूने सपासप वार करत तिची हत्या करण्यात आली. घरगुती वादामधून ही हत्या झाल्याची माहिती समोर आली आहे. पत्नीची हत्या करून आरोपी नवरा थेट पोलिस ठाण्यात गेला आणि पोलिसांना घटनेची माहिती दिली. पोलिसांनी या प्रकरणी आरोपीविरोधात गुन्हा दाखल करत त्याला अटक करण्यात आली. कोमल प्रशांत एडके असं मृत महिलेचे नाव आहे.

# पोलिसांतील गटबाजीचा गुन्हेगार घेऊ शकतात फायदा

■नाशिक। प्रतिनिधी:

ज्यांच्या खांद्यावर कायदा आणि सुव्यवस्थेची मुख्य जबाबदारी आहे, ते पोलीस अधिकारीच जर अंतर्गत राजकारणात मश्गुल असतील तर त्यांच्याकडून गुन्हेगारीमुक्त नाशिकची अपेक्षा तरी कशी करणार? राज्यात वाढलेल्या गुन्हेगारीला पोलिसांमधील अंतर्गत राजकारणदेखील जबाबदार असल्याचे काही सेवानिवृत्त अधिकारी सांगतात.

विविध शहरांतील क्रिम पोलीस स्टेशन्स विशिष्ट अधिकाऱ्यांनाच बहाल करणे, प्रामाणिकपणे आणि नियमाने काम करणाऱ्यांना साईड ब्रॅन्च देणे, विशिष्ट प्रकरणांचा तपास मध्येच थांबवणे किंवा या तपासाची जबाबदारी ऐनवेळी दुसऱ्याच अधिकाऱ्याला देणे, मंत्र्या-पुढाऱ्यांच्या निकटवर्तीय असल्याचा भास निर्माण करणाऱ्या अधिकाऱ्यांची हाजी-हाजी करणे, पदोन्नती प्रक्रियेतही वरिष्ठांनी नाहक हस्तक्षेप करणे यांसारख्या बाबींमुळे पोलीस विभाग मूळ कामांपासून दूर जात आहे. परिणामी गुन्हेगारी वाढत असल्याचे सेवानिवृत्त अधिकारी सांगतात.

अर्थात, पोलिसांमधील अंतर्गत राजकारण आताच खदखदत आहे असेही नाही. गेल्या अनेक वर्षांपासून हे राजकारण शिजत असून त्याचा थेट परिणाम कायदा आणि सुव्यवस्थेवर होताना दिसत आहे. राज्यभरात लूटमार, खंडणी, अवैध धंदे, टोळक्यांची उन्मत्त दादागिरी वाढत असताना पोलीस मात्र ह्यकोण कुठल्या गटाचा, कोणाच्या वरदहस्ताखालीह्ल या गणितात गुंतलेले दिसतात. या गोंधळाचा फायदा गुन्हेगार उचलतात, तर सामान्य नागरिकांची सुरक्षितता




धोक्यात येते. पोलीस दलातील सर्वच अधिकारी कुचकामी आहेत असेही नाही.

अनेक अधिकारी आपल्या खाकीची इभ्रत राखत गुन्हेगारांच्या मुसक्या आवळत आहेत. अशा अधिकाऱ्यांची संख्या वाढणे काळची गरज आहे. नाशिकमधील गुन्हेगारी कमी करण्यासाठी पोलिसांनी काय उपाययोजना कराव्यात या विषयीच्या तुमच्या काही सूचना असतील तर 9503356613 या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवा.

पोलीस म्हणतात वर्षभरात ५६ जणांविरुद्ध कारवाई

नाशिक शहर पोलीस आयुक्तालय अंतर्गत मागील दोन वर्षात अंमली पदार्थ विक्री करणाऱ्या व्यक्तींविरुध्द कारवाईचा आढावा जाहीर करण्यात आला आहे. पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांनी अंमली पदार्थाची खरेदी, विक्री, वाहतुक, साठवणूक करणाऱ्या व्यक्तींविरुध्द कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. शहरात अंमली पदार्थांची तस्करी करणाऱ्यांची माहिती घेऊन वेळोवेळी कारवाई करण्यात आलेल्या आहेत. सन २०२४ ते सप्टेंबर २०२५ या कालावधीमध्ये मॅफेड्रॉन (एमडी), गांजा, भांग व चरस या अंमली पदार्थ बाळगणारे व विक्री करणारे इसमांचा शोध घेवून त्यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे, सदर गुन्ह्यांमध्ये एकुण १७१ आरोपी जेरबंद केले आहेत. तसेच नाशिक शहरातील महत्वाची ठिकाणे जसे की, शाळा, कॉलेजेस, दवाखाने इ. परीसरातील पानटप-या वारंवार चेक करून तंबाखुजन्य पदार्थाचे अनुषंगाने कोटपा कायदयान्वये १३४ कारवाई करून दंडात्मक कारवाई केली आहे.

याव्यतिरीक्त अंमली पदार्थ्यांचे उत्पादन, साठवणूक यांच्यावर प्रतिबंधक उपाययोजना व निगराणी ठेवण्यासाठी नाशिक शहर आयुक्तालयातील वेगवेगळ्या परीसरातील रासायनिक कंपन्या, कारखाने व गोडावूनची वारंवार तपासणी करण्यात येते. यामध्ये ६०७ वेगवेगळे कारखाने व १५४२ गोडावून तपासणी करण्यात आले आहेत.

# दिराच्या प्रेमात होती पत्नी, नवऱ्याला लागली भनक... सासूसोबत थरकाप उडवणारं केलं कांड

■मुंबई। प्रतिनिधी:

आपण गेल्या काही दिवसांपासून मध्यप्रदेशमधील सासू जावयाच्या प्रेमात, बायकोचे दिरावर प्रेम असल्याच्या बातम्या ऐकल्या आहेत. आता अशीच आणखी बातमी समोर आली आहे. हा प्रकार बिहारच्या भागलपूरचा आहे, इथल्या शाहकुंडच्या गौरा गावात घडला आहे. एका महिलेने पतीच्या त्रासाला कंटाळून दिराशी लग्न केले. पण जेव्हा पतीला याबाबत कळाले तेव्हा त्याला राग अनावर झाला. त्याने सासूसोबत असे कांड केले की पोलिसांनाही धक्का बसला. गौरा गावात राहणाऱ्या मोहम्मद आफताबचे ५ वर्षांपूर्वी शबनमशी लग्न झाले होते. आफताब सतत दारू प्यायचा आणि शबनमला मारहाण करत



असते. अनेकदा पंचायती झाल्या, पण त्याच्या वागण्यात काही सुधार झाला नाही. तो पैसे कमवत नव्हता, घर खचार्साठीही पैसे देत नव्हता. याच दरम्यान शबनम आणि आफताबचा धाकटा भाऊ इम्तियाज यांच्यामध्ये जवळीक वाढली. दोघांनी सहा महिन्यांपूर्वी लग्न केलं. पण आफताबला हे पटलं नाही. त्याच्या डोक्यात राग होता.

शेतात झोपलेली होती सासू

अफताबच्या डोक्यात प्रचंड राग होता. गुरुवारी उशीरा रात्री शबनमची आई शेतात झोपली होती. रात्रीच्या सुमारास जावई मोहम्मद आफताब तिथे पोहोचला आणि त्याने सासूवर चाकूने हल्ला केला. ओरडण्याचा आवाज ऐकून जेव्हा मुलगी शबनम धावत आली, तेव्हा जावई आफताब घटनास्थळाहून पळून गेला. कुटुंबीयांनी सासूला ताबडतोब बीबी कौशरला जवाहरलाल नेहरू मेडिकल कॉलेज रुग्णालयात नेलं. पण रुग्णालयात पोहोचताच तिचा मृत्यू झाला.

प्रकरणाची चौकशी सुरू

घटनास्थळ सजोर आणि मधुसूदनपुर पोलिस स्टेशनच्या सीमेवर आहे. यामुळे पोलिसांची चौकशी अद्याप सुरू झालेली नाही. मधुसूदनपुर पोलिस स्टेशनचे प्रमुख सफदर अली यांनी सांगितलं की, पोलिस पथकाला चौकशीसाठी पाठवलं आहे. तर सजोर पोलिस स्टेशन क्षेत्रातील कायद्याची व्यवस्था करणारे डीएसपी नवनीत कुमार यांचं म्हणणं आहे की, घटना मधुसूदनपुर पोलिस स्टेशन क्षेत्रात घडली आहे, तरीही पोलिस स्टेशन प्रमुखाला चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत.

# नाल्यांमधील कचरा काढण्यासाठी पालिकेची 13 ऑक्टोबरपर्यंत विशेष मोहीम, करणार या वेळेत काम



■मुंबई। प्रतिनिधी:

गेल्या काही काळापासून मुंबई महानगरपालिकेने अनेक विशेष मोहिमा राबविल्या आहेत. अशामध्ये आता सोमवारपासून (29 सप्टेंबर) पालिकेने नाल्यांमधील तरंगता कचरा काढण्यासाठी विशेष मोहीम हाती घेतली आहे. पालिकेने दिलेल्या माहितीनुसार, 29 सप्टेंबर ते 13 ऑक्टोबर या कालावधीत दररोज सकाळी 11 ते दुपारी 1 या वेळेत कचरा काढण्यात येणार आहे. यानंतर कचऱ्याची विल्हेवाट लावणार आहे. महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी मुंबई महानगरात स्वच्छता मोहीम राबविण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार, मुंबईत विविध नाल्यांतील तरंगता कचरा काढण्यासाठी ह्यविशेष स्वच्छता मोहीमह्ल राबविण्याचा निर्णय अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) डॉ. अश्विनी जोशी यांनी घेतला आहे.

पावसाला सुरु होण्याआधी मुंबईतील लहान आणि मोठ्या नाल्यातील गाळ काढण्याची कामे आधीच झालेली असली तरी मुंबई महापालिकेने नाल्यातील तरंगता कचरा काढण्यासाठी ही विशेष मोहीम राबिवली आहे. या कामासाठी प्रमाणित कार्यपद्धती निश्चित केली आहे. या विशेष स्वच्छता मोहिमेत निष्काळजीपणा अथवा हयगय करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त डॉ. अश्विनी जोशी यांनी दिला आहे. तसेच, ह्लमुंबईतील अनेक छोट्या-मोठ्या नाल्यांमध्ये नागरिकांनी टाकलेल्या कचऱ्यामुळे पाणी तुंबण्याच्या घटना घडतात. अनेक भागांतील नाले नियमितपणे स्वच्छ केल्यानंतरही त्यात पुन्हा कचरा टाकण्याचे प्रकार थांबत नाहीत. त्यामुळे नागरिकांनी नाल्यांमध्ये कचरा न टाकता तो कचराकुंडीतच टाकावा,ह्ल असे आवाहनदेखील त्यांनी यावेळी केले आहे. 8 दिवसांच्या या विशेष मोहिमेमध्ये मुंबईतील विविध नाल्यांतील तरंगता कचरा हटवला जाणार आहे. या कालावधीत मुंबईतील प्रत्येक विभागातील प्रमुख नाले (कांदळवन क्षेत्र वगळून) तसेच नाल्याभोवताल असलेल्या परिसर, उघडी गटारे यामधील कचऱ्याचे संकलन केले जाणार आहे.

# एकाला पाण्यात ढकललं, दुसऱ्यालाही संपवलं; तिसऱ्यासाठी खास प्लान...

■महाबुबाबाद। प्रतिनिधी:

आपल्या मुलांसाठी आई काहीही करू शकते. पण तीच आई आपल्या मुलांच्या जीवावर उठली तर ? च्या महबूबाबाद मध्ये असाच एक भयनक प्रकार घडला आहे. तेथील दोन मुलांच्या हत्याकांडाचे गूढ पोलिसांनी उलगडले आहे. पण तपासात जी माहिती समोर आली त्याने सगळेच हादरले. तपासात असे आढळले की त्या मुलांची हत्या दुसऱ्या तिसऱ्या कोणी केली नसून, त्यांच्या स्वतःच्या आईनेच केली आहे. आरोपी आईला अटक करून तुरुंगात पाठवण्यात आले आहे. त्या आईने आपल्या मुलांच्या हत्येची डायरी लिहिली होती, तिने तिच्या दोन्ही मुलांची निर्घृण हत्या केली आणि नंतर सर्वांना दिशाभूल करण्यासाठी त्यांच्या हत्येची खोटी कहाणी रचली. मात्र, एका छोट्याशा सुगाव्यामुळे पोलिसांनी आरोपी आईला अटक केली आहे. हे प्रकरण महाबुबाबाद जिल्ह्यातील केसमुद्रम मंडलमधील नारायणपुरम गावातील आहे. सिरीशा आणि उपेंद्र हे तीन मुलांचे पालक होते. त्यांच्या सर्वात धाकट्या, दोन महिन्यांच्या नेहल नावाच्या बाळाचा 15 जानेवारी रोजी घराजवळील तलावात पडून मृत्यू झाला. त्या मुलाचा मृत्यू अपघाती आहे असंच सर्वांना वाटलं. मात्र, एका महिन्यापूर्वी, मोठा मुलगा मनीष कुमारवरही प्राणघातक हल्ला झाला. घरी आईच्या शेजारी झोपलेला असताना मनीषच्या मानेवर वार करण्यात आला. मुलाला घेऊन रुग्णालयात आलेल्या आईने तक्रार केली की काही अज्ञात लोकांनी तिच्या मुलाला मारण्याचा प्रयत्न केला पण सुदैवाने तो या हल्ल्यातून वाचला. मात्र त्यानंतर काही दिवसांनी, 24 सप्टेंबरच्या रात्री त्याने गळफास घेऊन आत्महत्या केली.

# मुंबईतील सिद्धिविनायक गणपती ट्रस्टकडून माणुसकीचं दर्शन, पूरग्रस्तांना तब्बल 10 कोटींची मदत

■मुंबई। प्रतिनिधी:

राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसामुळे प्रचंड नुकसान झालं आहे. अनेक ठिकाणी घरांची पडझड झाली आहे. काही ठिकाणी शेती वाहून गेली आहे. शेतातली पिकं अक्षरशः कुजली आहेत. अनेक संसार उद्धवस्त झाली आहेत. लहान मुलांची वह्या, पुस्तकं सर्व वाहून गेले आहेत. अनेक स्वप्न महापुराने वाहून नेले आहेत. त्यामुळे पूरग्रस्तांना आता मदतीची नितांत गरज आहे. पूरग्रस्त नागरिकांना पुन्हा उभं करणं ही नागरीक म्हणून आपली जबाबदारी आहे. त्यामुळे प्रत्येक जण आपापल्या परिने प्रयत्न करताना दिसत आहे. विशेष म्हणजे मोठमोठ्या मंदिर ट्रस्टकडून कोट्यवधी रुपयांची मदत पूरग्रस्तांना दिली जात



आहे. काल पंढरपूरच्या विठ्ठल-रुक्मिणी मंदिराकडून मंदिर जाहीर झाली. तसेच शिर्डीच्या साईबाबा मंदिर संस्थानकडूनही मदत जाहीर झाली. शेगावच्या गजानन महाराज मंदिर ट्र्स्टकडून मदत जाहीर झाली. यानंतर आता मुंबईच्या प्रसिद्ध सिद्धिविनायक मंदिरर ट्रस्टकडून मदत जाहीर झाली आहे. मुंबईच्या सिद्धिविनायक मंदिर ट्रस्टकडून राज्यातील पूरग्रस्तांना 10 कोटींची मदत जाहीर झाली आहे. सिद्धिविनायक मंदिर न्यासाकडून प्रसिद्धीपत्रक काढत याबाबत माहिती देण्यात आली आहे. तसेच ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांनी एक व्हिडीओ जारी करतही याबाबत माबिती दिली आहे. ₹महाराष्ट्र राज्यातील विविध भागांत गेल्या काही दिवसांपासून झालेल्या अतिवृष्टीमुळे गंभीर पूरस्थिती निर्माण झाली आहे. या नैसर्गिक आपत्तीत जिल्हांतील नागरिकांचे मोठया प्रमाणावर नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर पूरग्रस्तांच्या मदतीसाठी श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यासाने मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी रू. 10 कोटी देण्याचा निर्णय घेतला आहे₹, असं प्रसिद्धी पत्रकात म्हटलं आहे.

महाराष्ट्राचं संकट मोठं आहे. शेतकऱ्यांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. संपूर्ण महाराष्ट्र पुराच्या संकटातून झुंजत आहे. त्यामुळे महाराष्ट्र सरकार पूर्ण प्रयत्नदेखील करत आहे. भगवान श्री सिद्धिविनायकांच्या चरणी आम्ही प्रार्थना करतो. महाराष्ट्र या संकटातून लवकरात लवकर बाहेर पडावा. यासाठी श्री सिद्धिविनायक ट्रस्ट बोडार्ने मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये 10 कोटी रुपये देण्याचा निर्णय घेतला आहे, अशी माहिती सिद्धीविनायक मंदिर न्यासाच्या पदाधिकाऱ्यांकडून देण्यात आली आहे.

# तो दुबईहून परतला, घरात येताच बायकोची क्रूर हत्या, नंतर रागात...




■मुंबई। प्रतिनिधी:


पती-पत्नीचं नातं हे अतिशय पवित्र मानलं जातं. आयुष्याच्या शेवटच्या श्वासापर्यंत पती-पत्नी एकमेकांना साथ देतात, असं म्हटलं जातं. मात्र या विश्वासाला तडा बसेल अशी एक घटना समोर आली आहे. एका पतीने दुबईहून परतताच आपल्या पतीचा जीव घेतला आहे. मिळालेल्या माहितीनुसार ही घटना कर्नाटक राज्यातील बंगळुरूमधील उल्लाल येथील आहे. इथे एका व्यक्तीने रविवारी (28 सप्टेंबर) आपल्या पत्न ीची हत्या केली आहे. त्यानंतर त्याने स्वतःलादेखील संपवून घेतलं आहे. या दोघांचेही 2022 सालातील सप्टेंबर महिन्यात लग्न झाले होते. मृत महिला 27 वर्षांची होती. तिचे नाव मंजू असे होते. तर मंजूला ठार करून आत्महत्या केलेल्या व्यक्तीचे नाव धर्मशीलम असे होते. तो 30 वर्षांचा होता. तो नुकताच दुबईहून आपल्या पत्न ीकडे परतला होता. मृत मंजूच्या वडिलांनी पेरियास्वामी यांनी रात्री आम्हाला साधारण साडे नऊ वाजता दोघांचेही मृतदेह आढळले, असे सांगितले. मंजू बेडवर मृतावस्थेत होती. तिच्या शरीरावर चाकूने वार करण्यात आले होते. तर मृत धर्मशीलम याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे दिसून आले. मृत पती-पती दोघेही उल्लामच्या मुख्य रस्त्यावर भाड्याने खोली घेऊन राहात होते. पोलीस या प्रकरणाची चौकशी करत असून धर्मशीलम याने आपल्या पत्नीला नेमके का मारले याचा शोध घेतला जात आहे.

# हृदयविकारग्रस्तांना स्टेमी प्रकल्पाचा दिलासा; त्वरित उपचार मिळणे शक्य, राज्यातील ३४ जिल्ह्यांत प्रकल्प कार्यरत

■मुंबई। प्रतिनिधी:

हृदयविकाराचा तीव्र झटका आल्यानंतर गोल्डन अवरमध्ये औषधोपचार करून मृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी आणि तीव्र हृदयविकाराच्या झटक्याची चिन्हे ओळखण्यासह त्वरित उपचार करण्यासाठी आरोग्य विभागाने स्टेमी प्रकल्पाची सुरुवात केली. अधिकाधिक व्यक्तींमध्ये यासंदर्भात जनजागृती करण्याच्या उद्देशाने हा प्रकल्प सुरू करण्यात आला. या प्रकल्पामुळे अनेक रुग्णांना दिलासा मिळाला असून त्वरित वैद्यकीय उपचार मिळणे शक्य झाले आहे. राज्यातील ३४ जिल्ह्यांमध्ये हा प्रकल्प कार्यरत आहे. हृदयविकाराच्या रुग्णांवर हब संस्थेत या योजनेअंतर्गत अँजिओप्लास्टी, हृदयशस्त्रक्रिया करण्यात येतात.

सुरुवातीला हा स्टेमी प्रकल्प राज्यातील १२ जिल्ह्यांमध्ये सुरू करण्यात आला. आता राज्याच्या ३४ जिल्ह्यांतील १,९०६ प्राथमिक आरोग्य केंद्रांचा प्रकल्पात समावेश करण्यात आला आहे. या प्रकल्पामध्ये 'स्पोक' व 'हब' मॉडेल वापरण्यात



आले आहे. 'स्पोक' मध्ये उपजिल्हा व जिल्हा रुग्णालय यांचा समावेश असून त्या ठिकाणी अतिदक्षता विभाग आणि हृदयविकाराशी संबंधित अतितत्काळ सेवा दिल्या जातात. स्टेमी म्हणजे 'एसटी एलिव्हेशन इन मायोकार्डियल इन्फार्कशन'. हा सामान्यतः आढळणारा हृदयविकाराचा प्रकार आहे. यात हृदयाच्या काही भागास होणारा रक्तपुरवठा थांबल्यामुळे अपुऱ्या ऑक्सिजनमुळे हृदयाच्या मांसपेशींना इजा होऊन हृदयविकाराचा झटका येतो. हृदयविकाराचा झटका आल्यानंतर अर्ध्या तासाच्या आत औषधोपचार करून मृत्यूचे प्रमाण कमी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

ईसीजी तपासण्यांची संख्या वाढती

पूर्वी हृदयरोगाच्या लक्षणांकडे दुर्लक्ष केल्यामुळे वैद्यकीय तपासण्या करण्यात वेळ जात असे. आता मात्र ही स्थिती बदलली आहे. ईसीजी तपासण्यांची संख्या वाढती आहे. सन २०२०-२१मध्ये ३,४०२ ईसीजी तपासण्या करण्यात आल्या. सन २०२२-२३मध्ये ही संख्या वाढून ३ लाख ३५ हजार १२७ इतकी नोंदवण्यात आली. सन २०२३-२४मध्ये ३ लाख ९६ हजार ४४४ ईसीजी तपासण्या करण्यात आल्या. सन २०२५ ते ३० एप्रिल २०२५ या चार महिन्यांच्या कालावधीमध्ये १ लाख ४१ हजार १९० ईसीजी तपासण्या करण्यात आल्या. त्यापैकी ६६२ स्टेमी प्रकल्पांची नोंद करण्यात आली, अशी माहिती आरोग्य विभागाने दिली आहे.

हृदयविकाराची प्रमुख कारणे...

उच्च रक्तदाब व मधुमेह, अनुवांशिकता, असंतुलित आहार, शारीरिक हालचाली कमी असणे किंवा न करणे, तंबाखूचे व्यसन, मद्यपान आदी, दैनंदिन जीवनशैली, मानसिक तणाव

हृदयविकारांत वेगाने वाढ

बदलती जीवनशैली, वाढती व्यसनाधीनता, तसेच हृदयाच्या आरोग्याकडे दुर्लक्ष या कारणांमुळे हृदयविकारांमध्ये काही वर्षांत वेगाने वाढ होत आहे. हृदयाला रक्तपुरवठा करणाऱ्या रक्तवाहिन्यांच्या आजारांमुळेही मृत्यू, तसेच अपंगत्व येण्याचे प्रमाण वाढले आहे. हृदयरोगाचे प्रमाण ग्रामीण भागात तीन ते चार टक्के, तर शहरामध्ये आठ ते दहा टक्के आहे, अशी माहिती राज्याच्या आरोग्य विभागाने दिली. त्यामुळे हृदयाचे आरोग्य जपा, योग्य वेळी वैद्यकीय चाचण्या करून घ्या, असा सल्ला डॉक्टरांनी दिला आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com